**ठळक बातम्या**

- निवडणूक म्हणजे लोकशाहीतला मोठा उत्सव आणि भावी पिढ्यांच्या मनात लोकशाहीची मूल्यं रुजवण्याची एक संधी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी आज देशभरात मतदान सुरू
- राष्ट्रपती, उपराष्ट्रपतींसह अनेक मान्यवरांनी बजावला मतदानाचा अधिकार

- भारताच्या परकीय चलन  गंगाजळीची नव्या सार्वकालिक उच्चांकावर झेप

- पापुआ न्यू गिनी मध्ये झालेल्या भूस्खलनामुळे तीनशेहून जास्त लोकांचा मृत्यू.

**आणि**

- दक्षिण कोरियामध्ये झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिला संघाची  सुवर्ण पदकाला गवसणी, मिश्र दुहेरीत रौप्यपदक.

**<><><><><>**

निवडणूक म्हणजे लोकशाहीतला मोठा उत्सव आणि भावी पिढ्यांच्या मनात लोकशाहीची मूल्यं रुजवण्याची एक संधी असल्याचं प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.  डीडी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ते आज बोलत होते. सरकार किंवा राजकीय पक्षांनी त्यांच्या

कामाचा हिशेब जनतेला द्यावा, असं मत त्यांनी व्यक्त केलं. निवडणूक म्हणजे लोकांना भेटण्याची एक प्रकारची संधी आहे असं मी मानतो. कोणत्याही प्रकारची टीका आपण गांभीर्यानं घेतो असही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी आज देशभरात मतदान सुरू आहे. सहा राज्यं आणि दोन केंद्रशासीत प्रदेशातल्या ५८ मतदारसंघासाठी हे मतदान होत आहे. उत्तरप्रदेशातल्या १४, हरियाणातल्या सर्व १०, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये प्रत्येकी आठ, दिल्लीत सर्व ७, ओदिशामधल्या सहा, झारखंडमधल्या ४ आणि जम्मू काश्मीरमधल्या एका मतदारसंघासाठी आज मतदान होत आहे. सकाळी सात वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली असून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहील.

**सकाळी अकरा वाजेपर्यंत** अंदाजे २६ टक्के मतदान झालं आहे. यात पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ३७ टक्के इतकं मतदान झालं आहे.

इतर राज्यातलं मतदान पुढीलप्रमाणे

झारखंड २८ टक्के

उत्तर प्रदेशमध्ये २७ टक्क्यांपेक्षा जास्त

बिहारमध्ये २४ टक्के

जम्मू काश्मिरमध्ये २३ टक्क्यांपेक्षा जास्त

हरयाणा आणि दिल्ली प्रत्येकी २२ टक्के

ओदिशामध्ये २१ टक्के इतकं मतदान झालं आहे.

**निवडणुकीच्या या टप्प्यात** अकरा कोटी मतदार, ८८९ उमेदवारांचं भवितव्य ठरवणार आहेत.

या टप्प्यात भाजपाचे ज्येष्ठ नेते धर्मेंद्र प्रधान, मनोहरलाल खट्टर, मनेका गांधी, मनोज तिवारी, तसंच काँग्रेसचे नेते दीपेंदर सिंह हुड्डा, कुमारी शैलजा, राज बब्बर आणि कन्हैय्या कुमार, निवडणुकीला सामोरे जात आहेत. जम्मू काश्मिरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती आणि समाजवादी पार्टीचे नेते धर्मेंद्र यादव हेही आपलं नशीब आजमावत आहेत.

**दरम्यान, ओदिशा** विधानसभेच्या ४२ जागांसाठीही आज मतदान सुरू आहे. हरयाणामधल्या कर्नाल आणि उत्तरप्रदेशातल्या गैनसरी या विधानसभा मतदारसंघातही आज पोटनिवडणूक होत आहे.

**<><><><><>**

राजधानी दिल्लीमध्ये अनेक मान्यवरांनी आज मतदानाचं कर्तव्य बजावलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी मतदानाचा अधिकार बजावला. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियांका गांधी, दिल्ली राज्य सरकारमधल्या मंत्री आतिशी यांनी आज मतदान केलं. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, मंत्री हरदीप पुरी, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, गृह सचिव अजय भल्ला, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या वृंदा करात,

भाजपाचे उमेदवार मनोज तिवारी, काँग्रेसचे उदित राज यांनीही मतदानाचा अधिकार बजावला.

**<><><><><>**

भारताच्या परकीय चलन गंगाजळीनं १७ मे रोजी संपलेल्या आठवड्यात ४ पूर्णांक ५४९ अब्ज डॉलर्सची वाढ नोंदवत ६४८ पूर्णांक ७ अब्ज डॉलर्सच्या नव्या सार्वकालिक उच्चांकावर झेप घेतली आहे. परकीय चलनातल्या वाढीचा हा सलग तिसरा आठवडा आहे.

याच आठवड्यात सोन्याचा साठाही १ पूर्णांक २४४ अब्ज डॉलर्सनी वाढून ५७ पूर्णांक १९५ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे. मात्र याच आठवड्यात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी-IMF मधला भारताचा राखीव निधी १६ कोटी ८० लाख डॉलरनी घसरून ४ पूर्णांक ३२७ अब्ज डॉलरवर आला आहे. त्यामुळे भारताचे स्पेशल ड्रॉइंग राइट्स-एसडीआर, ११ कोटी ३० लाख डॉलर्सनी वाढून १८ पूर्णांक १६८ अब्ज डॉलर्सवर पोहोचले आहेत. एस डी आर हा IMF नं, सदस्य देशांच्या अधिकृत राखीव निधीला पूरक म्हणून तयार केलेला आंतरराष्ट्रीय राखीव निधी आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी सर्वच पक्षांच्या प्रचारसभांना आता वेग आला आहे. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज उत्तरप्रदेश आणि बिहारमध्ये प्रचारसभांना संबोधित करतील. बिहारमधल्या पाटलीपुत्र, काराकट आणि बक्सर इंथ

मोदी सभा घेणार आहेत. त्यानंतर संध्याकाळी गाझीपूरमध्ये त्यांची सभा होणार आहे.

गोरखपूर इथं काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांची संयुक्त सभा होणार आहे. बहुजन समाज पार्टीच्या प्रमुख मायावती याही गोरखपूरमध्ये सभा घेणार आहेत. तर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सालेमपूर, बलिया आणि मुघलसराय इथं प्रचारसभा होणार आहेत.

<><><><><>

पापुआ न्यू गिनी मध्ये उत्तरेकडच्या  दुर्गम भागातल्या खेड्यात भूस्खलनामुळे तीनशेहून जास्त लोकांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त होत आहे. राजधानी पोर्ट मोरेस्बीच्या वायव्येला ६०० किलोमीटर अंतरावर असलेल्या एन्गा प्रांतातल्या काओकलम  गावात झालेल्या या भूस्खलनात १,१०० हून जास्त घरंही गाडली गेली आहेत. मुलिताका भागात ६ हून जास्त गावांनाही या भूस्खलनाचा फटका बसला आहे. भूस्खलनामुळे महामार्ग  बंद झाला असून या भागात पोहोचण्यासाठी हेलिकॉप्टर हा एकमेव पर्याय आहे.

<><><><><>

दक्षिण कोरियामध्ये झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिला संघानं सुवर्ण पदक जिंकलं आहे. ज्योती सुरेखा वेन्नम, परनीत कौर आणि आदिती स्वामी यांच्या संघानं तुर्कीएच्या संघाला अंतिम सामन्यात

पराभूत केलं. दरम्यान, ज्योती आणि प्रियांश यांना मिश्र दुहेरीत अमेरिकेच्या ऑलिव्हिया डीन आणि सॉयर सुलियन यांच्याकडून पराभव पत्करावा लागल्यामुळे रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

<><><><>

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत आज महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत, दोन वेळा ऑलिम्पिक पदकाला गवसणी घालणाऱ्या भारताच्या पी व्ही सिंधूचा सामना थायलंडच्या बुसानन ओंगबामरूंगफान हिच्याशी होत आहे. तिनं काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित चीनच्या हान युए हिचा पराभव केला. महिला एकेरीच्या दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीत मात्र भारताच्या अश्मिता चलिहा हिला चीनच्याच झ्हान्ग यी मान हिच्याकडून हार पत्करावी लागली.

<><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये काल संध्याकाळी चेन्नई इथं झालेल्या दुसऱ्या प्ले ऑफ सामन्यात सनरायझर्स हैदराबादनं राजस्थान रॉयल्स संघाचा ३६ धावांनी पराभव केला. अंतिम सामना उद्या सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात होणार आहे. हा सामना चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियमवर होणार आहे.

<><><><>

विको कंपनीचे अध्यक्ष यशवंतराव पेंढारकर यांचं काल नागपूरमध्ये निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. २०१६ पासून त्यांनी विको कंपनीच्या

अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. त्यांच्या नेतृत्वात कंपनीनं कालसुसंगत बदल स्वीकारत प्रगतीचे नवनवे टप्पे गाठले. त्यांच्याच कार्यकाळात कंपनीला इकनॉमिक टाइम्सचा २०२३ या वर्षाचा ‘ब्रँड ऑफ द इअर’ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला होता. पेंढारकर यांच्या पार्थिवावर नागपूरच्या अंबाझरी घाट इथं आज सकाळी अंत्यसंस्कार झाले.

**<><><><><>**

पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात तयार झालेला तीव्र दाबाचा पट्टा आज संध्याकाळपर्यंत ‘रेमल’ चक्रीवादळात रूपांतरीत होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे. ‘रेमल’ चक्रीवादळ उद्या मध्यरात्रीपर्यंत बांग्लादेश आणि पश्चिम बंगालची किनारपट्टी ओलांडेल आणि त्यानंतर त्याचं तीव्र चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता हवामान विभागानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात व्यक्त केली आहे. यामुळे पश्चिम बंगालमध्ये जोरदार ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. याकाळात, उत्तर ओदिशाच्या किनारपट्टीलगत तुरळक ठिकाणी जोरदार तर ईशान्येकडच्या राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. या संभाव्य चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी कॅबिनेट सचिव राजीव गौबा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक काल घेण्यात आली. मच्छीमारांनी समुद्रात जाऊ नये असं आवाहन करण्यात आलं असून जिल्हा नियंत्रण कक्ष सक्रिय केले आहेत. पुरेसा निवारा, वीजपुरवठा, औषधं आणि आपत्कालीन यंत्रणाही तयार ठेवल्या आहेत. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद

दलाची १२ पथकं तसंच ५ अतिरिक्त पथकंही सज्ज ठेवली आहेत. लष्कर, नौदल आणि वायुदलाच्या नौका तसंच विमानंही, संभाव्य आपत्तीचा सामना करण्यासाठी सज्ज ठेवली आहेत. ‘रेमल’चक्रीवादळाचा सामना करण्यासाठी भारतीय तटरक्षक दलानेही संभाव्य हानी टाळण्याच्या दृष्टीनं आपली पथकं तैनात ठेवली आहेत.

**<><><><><>**

देशाच्या उत्तर आणि वायव्य भागात उष्णतेची लाट  सुरू आहे. हवामान विभागानं देशाच्या वेगवेगळ्या भागात रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केले आहेत. राजस्थान, पंजाब, हरियाणा, चंदीगड, उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग, मध्यप्रदेश आणि  गुजरातमध्ये  उष्णतेची तीव्र लाट, दोन ते तीन दिवस  राहण्याची शक्यता आहे. दरम्यान केरळ,  अंदमान - निकोबार बेटांचा समूह, कोकण, गोवा आणि विर्दभात पुढचे दोन दिवस जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. याकाळात मच्छिमार बांधवांनी बंगालच्या उपसागराच्या मध्य भागात  उद्यापर्यंत  आणि बंगालच्या उपसागराच्या उत्तर भागात सोमवारपर्यंत मासेमारीसाठी जाऊ नये असं विभागानं सांगितलं आहे.

दरम्यान, उष्णतेच्या लाटेच्या पार्शवभूमीवर  आसामच्या कामरूपसह अनेक जिल्ह्यात शाळांच्या वेळांमध्ये बदल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानात वाढत्या तापमानामुळे आलेल्या उष्णतेच्या लाटेचा फटका हजारो नागरिकांना बसत आहे. पाकिस्तानात तापमान साधारण ५० अंश सेल्सिअस असून उष्म्यानं ग्रस्त हजारो नागरिक रुग्णालयात उपचार घेत आहेत. वाढत्या तापमानाचा सलग चौथा दिवस असून तापमान ५१ अंश सेल्सिअस होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. पाकिस्तान सरकारनं शाळांच्या परीक्षा पुढे ढकलल्या असून शाळा बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

**//<><><><><>//**